| | |
|---|---|
| MHBU070017772023 | CNR NO: MHBU070017772023 |
| | नि.फौ.प्रकरण क्र.१९४/२०२३ |
| | सरकार .वि. राहुल चौधरी |

<u>निशाणी क्र. ८९ वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज अर्जदार सौ. पुनम देवीदास चौधरी यांनी त्यांचे सोन्याचे व चांदीचे दागीणे सुपूर्तनाम्यावर मिळण्याकरीता दाखल केला असुन अर्जदाराच्या कथनानुसार तिने व तिच्या पतीने स्वकष्टाच्या कामाईतुन सदरचे दागीने विकत घेतले होते. अर्जदाराच्या कथनानुसार पोलीसांनी तिच्या पतीला अटक करुन सदरचे दागीने तिच्या बहीणीच्या घरुन ताब्यात घेतले आहे. अर्जदाराने सोन्याच्या व चांदीचे दागीणे खरेदी केल्याच्या पावत्या दाखल केल्या असुन अर्जदाराने सोन्या चांदीचे दागीणे सुपूर्तनाम्यावर मिळणेकरीता मागणी केली आहे.

२. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त सोन्याचे व चांदीचे दागीणे अर्जदारास सुपुर्तनाम्यावर देण्यास हरकत घेतली असुन अर्जदाराचे अर्जातील सर्व कथने खोटी व बनावट असल्याचे कथन केले. तसेच सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले सोन्याचे व चांदीचे दागीणे खरेदी करण्याकरीता आरोपीने फिर्यादी तसेच गावातील शेतकरी यांची फसवणुक करुन मिळवलेल्या पैशाचा वापर केल्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर गुन्हयात जप्त सोन्या चांदीचे दागीणे अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देण्यास हरकत नोंदवुन अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्जदाराने तिच्या म्हणण्याच्या पुष्टेतार्थ सोन्याचे व चांदीचे दागीणे खरेदी केल्याच्या पावत्या प्रकरणात दाखल केल्याचे कथन केले आहे.

**४.** अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तिने मागणी केलेले सोन्याचे व चांदीचे दागीणे हे कागदोपत्री तिच्या मालकीचे असल्याबाबत दिसुन येत आहे. परंतु सहायक सरकारी वकील यांच्या म्हणण्यानुसार सदरचे सोन्या चांदीचे दागीणे आरोपीने प्रकरणातील फिर्यादी तसेच इतर शेतकरी यांची फसवणुक करुन त्यातुन मिळालेल्या रकमेतुन खेरदी केल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की प्रकरणात आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी तसेच इतर शेतक–यांकडुन शेतमाल खरेदी केला परंतु त्यांना त्याचा मोबदला दिला नाही. करीता सदरचा गुन्हा सर्व आरोपींविरुध्द नोंदविण्यात आला आहे व अर्जदाराचा पती सुध्दा प्रकरणातील आरोपींमध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे गुन्हयातील पैशाचा वापर करुन सदरचे सोन्याचे व चांदीचे दागीणे खरेदी केले असल्याचे प्रथमदर्शी दिसुन येते आहे. त्यामुळे सद्यस्थीतीत सदरचे दागीणे

CNR NO: MHBU070017772023

नि.फौ.प्रकरण क्र.१९४ /२०२३
सरकार - वि- राहुल चौधरी
निशाण क्र. ८९ खालील आदेश

अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देणे न्यायोचीत होणार नाही. तसेच गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता सहायक सरकारी अभियोक्ता यांनी सदरचे सोन्याचे व चांदीचे दागीणे सुपुर्तनाम्यावर देण्यास घेतलेल्या आक्षेपामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येते. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्जदाराचा अर्ज नि.क्र. ८९ नामंजुर करण्यात येतो.

स्वा./-

दिनांक :- ०७.०२.२०२४

( जे. आर. घाडगे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ ले कोर्ट शेगांव.

CNR NO: MHBU070017772023

नि.फौ.प्रकरण क्र.१९४ /२०२३
सरकार - वि- राहुल चौधरी
निशाण क्र. ८९ खालील आदेश

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– के. एस. देशमुख, ग्रेड–३
न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,पहिले कोर्ट, शेगांव.
दिनांकः– ०७.०२.२०२४.